# राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेसमोर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८ अन्वये दाखल तक्रार

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती
संभाजीनगर, बचत भवन लेखा व कोषागार
कार्यालयाच्या पाठीमागे,छत्रपती संभाजीनगर
-४३१००१

**तक्रार क्र.५१२/२०२२/छ.संभाजीनगर**
**(द्वितीय अपील क्र.१०३१/२०२०मध्ये)**

श्री.महेश शंकरलाल शंकरपेल्ली, : तक्रारदार
रा. माँ दर्गा निवास,शास्त्री कॉलनी,सिल्लोड
जि.छत्रपती संभाजीनगर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
सह दुय्यम निबंधक वर्ग-२,सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी
सह जिल्हा निबधक वर्ग-१छत्रपती संभाजीनगर,
जि. छत्रपती संभाजीनगर

**निर्णय**
**(सुनावणी दि. ०७.११.२०२३)**

तक्रारदार यांनी दि.२९.०४.२०२२ रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

"तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रार अर्जात खालीलप्रमाणे तक्रार केलेली आहे.

मला हवी असलेली माहिती मला प्राप्त न झाल्यामुळे मी नियमानुसार राज्य माहिती आयोग खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे व्दितीय अपील क्रमांक १०३१/२०२० दाखल केले होते.त्यानुसार आयोगाने दिनांक ०५.०४.२०२१ रोजी माहिती देण्याबाबत आदेश परित केले होते. मा.आयोगाच्या निर्णयाची प्रत जोडून, मी दिनांक १९.०७.२०२१रोजी मा.दुय्यम निंबधक वर्ग-२ कार्यालय सिल्लोड व सहजिल्हानिंबधक वर्ग-१कार्यालय,छत्रपती संभाजीनगर, यांना लेखी स्मरणपत्र दिले होते.मा.राज्य माहिती आयोग यांच्या आदेशाच्या अनुषंगाने सह जिल्हा निंबधक वर्ग -१ छत्रपती संभाजीनगर यांना लेखी स्मरणपत्र दिले होते. परंतु अद्याप पर्यत त्यांनी मला जाणीवपूर्वक कसलाही /कोणताही प्रतिसाद दिलेला नाही."

सदर आदेशाची अंमलबजावणी केली नाही, अशी तक्रार करुन संबंधितावर कलम २०(१) (२) नुसार शिस्तभंग व दंडात्मक कार्यवाही करावी, अशी मागणी तक्रारदाराने केली आहे.

आयोगाने व्दितीय अपील क्र.१०३१/२०२० मध्ये दि.०७.१२.२०२०रोजी खालीलप्रमाणे आदेश दिलेले होते.

"वर्तमान जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसात अपिलार्थी व्यक्तिश: उपस्थित राहिल्यास त्यांना माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ व २ माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी,असा आदेश दिला आहे. "

सदर प्रकरणावर दि.१३.०६.२०२३ रोजी ऑनलाईन सुनावणी घेण्यात आली होती, परंतु सदरील प्रकरणात सुनावणी परिपूर्ण न झाल्यामुळे सदरील प्रकरणात सुनावणी परिपूर्ण होण्यासाठी पुढील तारीख ठेवण्यात आली. पुढील सुनावणीला व्यक्तिश: उपस्थित राहण्यासाठी व माहिती देण्यात आली अथवा कसे याबाबतचा खुलासा सादर करण्यासाठी श्री.अ.वि.चटलावार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निंबधक वर्ग-२

सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांना दि.०३.०८.२०२३रोजी कारणे दाखवा नोटीस देण्यात आली.

त्यानुसार दि.२२.०८.२०२३ रोजी श्री.अ.वि.चटलावार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निंबधक वर्ग-२ सिल्लोड जि.छत्रपती संभाजीनगर यांनी खुलासा सादर केला.त्यामध्ये त्यांनी सुचित केले की, आयोगाचा आदेशानुसार त्यांनी जा.क्र. /अपिल१०३० /१०३२/२०२० १४९-१५९/२०२१च्या पत्रान्वये दिनांक २३.०७.२०२१रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ सिल्लोड कार्यालयात अभिलेख स्वरुपात असलेली माहिती या कार्यालयातुन तक्रारदारास व्यक्तीश: घेऊन जाण्यासाठी कळविले होते. परंतु तक्रारदार यांनी मी दि.०६.०९.२०२१रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ सिल्लोड कार्यालयात कार्यरत असे पर्यत तक्रारदार यांनी माहिती घेऊन जाण्यासाठी आले नाहीत. त्यानुसार त्यांनी अभिलेख/पुरावा सोबत सादर केला आहे. त्यामुळे त्यांच्या कथनात तथ्यांश आढळून येतो.

आज दिनांक ०७.११.२०२३ रोजी सुनावणीस तक्रारदार श्री.महेश शंकरलाल शंकरपेल्ली, हे उपस्थित आहेत.तर श्री.अ.वि.चटलावार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निंबधक वर्ग-२ सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर यांनी दि.०६.११.२०२३ रोजी वैद्यकीय कारणास्तव दि.०७.११.२०२३ रोजीच्या सुनावणीसाठी उपस्थित राहू शकत नसल्याबद्दलचे विनंती अर्ज त्यांनी आयोगाच्या कार्यालयात सादर केला. त्यामुळे ते सुनावणीसाठी अनुपस्थित आहेत.

आयोगासमोरील अभिलेखावरुन असे दिसून येते की, श्री.महेश शंकरलाल शंकरपेल्ली यांनी दि.१९.०७.२०२१ रोजी यांनी सह दुय्यम निंबधक वर्ग-२ सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासोबत माहिती मिळण्यासाठी जो पत्रव्यवहार केला.त्या अनुषंगाने श्री.अ.वि.चटलावार तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निंबधक वर्ग-२ सिल्लोड यांनी दि.२३.०७.२०२१रोजीच्या प्रतिसाद दिला. त्यामध्ये "उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरुन मा.राज्य माहिती आयोग यांचे आदेश व तक्रारदार यांचे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.संदर्भिय आदेशानुसार या कार्यालयात अभिलेख स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती आपणास देण्यात येईल. त्या अनुषंगाने कळविण्यात येते की,हवी असलेली माहिती या कार्यालयातून आपण व्यक्तीश: घेऊन जावे",असे कळविले. त्यानंतर तक्रारदार यांनी सह दुय्यम निबंधक वर्ग-२,सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात जावून माहिती हस्तगत करण्यासाठी कोणते प्रयत्न केले,त्यांविषयीचा लेखी पुरावा ते सुनावणी दरम्यान आयोगासमोर सादर करु शकले नाहीत.

यावरुन श्री.अ.वि.चटलावार,तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निंबधक वर्ग-२ सिल्लोड,जि.छत्रपती संभाजीनगर यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याचे स्पष्ट होते. तसेच तक्रारदार यांनी माहिती हस्तगत करण्यासाठी कोणते प्रयत्न केले होते, यांचा लेखी पुरावा ते सुनावणी दरम्यान आयोगासमोर सादर करु शकले नाहीत. त्यामुळे सदरची तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

द्वितीय अपिलातील आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याकारणाने सदर तक्रार निकाली काढण्यात येत आहे.

(समीर सहाय)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

तक्रार क्र.५१२/२०२२/छ.संभाजीनगर/ एबीजे/जावक क्र. 19624 /२०२३ दिनांक : 26/12/2023